समय मर्यादीत
आठवडी बाजार लिलाव
सन २०१८-२०१९

क्र.जिपव/ग्रापं/अनु.शाखा/वशि-९०९ /२०१८
कार्यालय जिल्हा परिषद,वर्धा,
दिनांक :-३१/ ०१ /२०१८.

प्रति,

गट विकास अधिकारी
पंचायत समिती, वर्धा/देवळी/समुद्रपूर/हिंगणघाट/आर्वी .

विषय :- **जिल्हा परिषद ,वर्धा अंतर्गत आठवडी बाजार जाहीर लिलाव.**
**सन २०१८-२०१९ (माहे १ एप्रिल २०१८ ते ३१ मार्च २०१९ या कालावधी करिता)**

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी जिल्हा परिषद वर्धा चे अखत्यारीत येत असलेल्या आठवडी बाजार लिलाव **सन २०१८-२०१९ (माहे १ एप्रिल २०१८ ते ३१ मार्च ,२०१९** या कालावधी करिता ठेकयाने देणे करिता ) खालील आठवडी बाजार चे जाहीर (हर्रास)-लिलाव करण्यात येत आहे.

**(अ). आठवडी बाजाराचे नाव** :- **(१) पंचायत समिती वर्धा अंतर्गत** :- १) सालोड (हिरापूर), २)तरोडा
**(२)पंचायत समिती ,देवळी अंतर्गत**:- १) सोनोरा २) सांवगी (येंडे) ३) शिरपूर (होरे), ४) नागझरी
**(३) पंचायत समिती हिंगणघाट अंतर्गत** :- १.खानगाव
**(४)पंचायत समिती समुद्रपूर अंतर्गत** :- १)वायगाव हळदया. कांढळी रोडवरील आंबा फळबहार.
**(५) पंचायत समिती आर्वी अंतर्गत** :- १)दहेगाव मुस्तफा रोडवरील आंबा फळबहार.
**येथील बाजाराचे जाहीर लिलाव खालील दिनांकास करण्यात येत आहे.**

| क्र | बाब | दिनांक | | | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रथम लिलाव | दुबार लिलाव | तिबार लिलाव | | |
| १ | आठवडी बाजार | ०७/०२/२०१८ | १६/०२/२०१८ | २२/०२/२०१८ | ११.३० | जिल्हा परिषद,सभागृह वर्धा |

**(ब) आठवडी बाजार - अ) पंचायत समिती वर्धा अंतर्गत १) आंजी (मो.),२) मदनी ब) पंचायत समिती, समुद्रपूर अंतर्गत १) मांडगांव २) कोरा क) पं.स. हिंगणघाट अंतर्गत** १) **पोहणा**, २) **शिरसगांव** चे ई-लिलाव करण्यात येत आहे.

**ई-लिलाव अटी व शर्ती, निविदा सुचना या बाबतची सविस्तर माहिती http:www.eauction.gov.in या वेब साईट वर पाहायला मिळेल. ई-लिलाव प्रसिध्दी दि. ०१/०२/२०१८ व ई लिलाव दिनांक- १४ व १५ फेब्रुवारी, २०१८.**

सदर बाबीस व्यापक प्रसिध्दी मिळण्यास्तव आपले पंचायत समिती अंतर्गत सर्व ग्राम विकास अधिकारी /ग्राम सेवक यांना या बाबत त्यांचे ग्राम पंचायती मध्ये दवंडी देण्यास्तव तसेच नोटिस बोर्डवर लिलाव जाहिरात लावण्याबाबत आदेशीत करावे, जेणे करून लिलावास जास्तीत जास्त ठेकेदार उपस्थित राहतील. बाजाराचे बाबतीत अटी तथा आठवडी बाजाराचे सरासरीचे प्रपत्र या सोबत संलग्न करून पाठविण्यात येत आहे.

**टिप :- जाहीर लिलावात भाग घेणा-यानी लिलावाचे दिवशी सोबत फोटो असलेले ओळख पत्राची (आधार कार्ड) मुळ प्रत व झेरॉक्स आणावी.**

**सहपत्र :- आठवडी बाजार सरासरी प्रपत्र तथा आठवडी बाजाराचे अटि**

**मुळप्रत मा.मु.का.अ.अनुमोदीत**

**मुख्य कार्यकारी अधिकारी ,**
**जिल्हा परिषद,वर्धा करीता**

**प्रतिलिपी तात्काळ कार्यवाहीकरीता अग्रेषीत :-**

१. विस्तार अधिकारी (पंचायत) मार्फत गट विकास अधिकारी पंचायत समिती -------------
२. ग्रामपंचायत ------------मार्फत गट विकास अधिकारी पंचायत समिती ----------------
३. रोखपाल,सामान्य प्रशासन विभाग,जिल्हा परिषद,वर्धा आपण वरील प्रपत्रात दर्शविलेल्या तारखेला अनामत रक्कम तथा बाजाराची ५० टक्के रक्कम त्याच दिवशी संबधित ठेकेदाराकडून घेऊन अधिकोषात जमा करण्याचे करावे. प्रकरणी सदर कार्यवाही पार पाडणे करिता पावतीबुकासह नियोजित वेळेवर उपस्थित रहावे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी ,**
**जिल्हा परिषद,वर्धा, करीता**

३१/१/१८

जिल्हा परिषद,वर्धा अंतर्गत बाजार लिलावपासुन सन 2015-2016, 2016-17 व 2017-2018 चे प्राप्त उत्पन्न व सन 2018-2019 ची अपेक्षित मागणी. (सरासरी किंमती मध्ये 20 टक्के वाढ करुन)

| अक्र | पंचायत समिती | बाजाराचे नांव | बाजार भरण्याचा दिवस | मागील तिन वर्षाचे उत्पन्न | | | सन 2018-2019 ची सरासरी | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 2015-2016 | 2016-2017 | 2017-2018 | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1 | वर्धा | आंजी मोठी | गुरुवार | 166,100 | 199,360 | 198,224 | 225,474 | |
| 2 | | सालोड हिरापुर | मंगळवार | 0 | 600 | 1200 | 720 | |
| 3 | | तरोडा | शुक्रवार | 50,000 | 61,800 | 72,500 | 73,720 | |
| 4 | | मदनी | बुधवार | 67500 | 100000 | 127100 | 117,840 | |
| 5 | देवळी | सोनोरा ढोक | मंगळवार | 4,000 | 10,300 | 6,000 | 8,120 | |
| 6 | | सावंगी येंडे | शुक्रवार | 1500 | 1800 | 2200 | 2,200 | |
| 7 | | शिरपुर होरे | | 0 | 14300 | 17200 | 12,600 | |
| 8 | | नागझरी | बुधवार | 410 | 2600 | 2000 | 2,004 | |
| 9 | हिंगणघाट | खानगांव | गुरुवार | 9000 | 12000 | 15000 | 14,400 | |
| 10 | | पोहणा | शुक्रवार | 56,600 | 106,500 | 91,300 | 101,760 | |
| 11 | | शिरसगांव | शुक्रवार | 65200 | 101500 | 107200 | 109,560 | |
| 12 | समुद्रपुर | मांडगांव | मंगळवार | 120,100 | 135,440 | 159,216 | 165,902 | |
| 13 | | कोरा | शुक्रवार | 160,200 | 165,880 | 166,192 | 196,909 | |
| 14 | | वायगांवह.कांढळी रोड वरील आंबा फळबहार | --- | 0 | 0 | 0 | 0 | लिलावानुसार |
| 15 | आर्वी | दहेगांव (मु) रोडवरील आंबा फळबहार | --- | 0 | 0 | 0 | 0 | लिलावानुसार |
| | एकुण | | | | 912,080 | 965,332 | 1,031,209 | |

(विपूल जाधव)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)
जिल्हा परिषद,वर्धा,

(स. भा. शेळके)
मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी
जिल्हा परिषद, वर्धा

(नयना गुंडे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,वर्धा,

## सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षाकरिता आठवडी बाजार लिलावाच्या अटी व शर्ती.

१. लिलावात भाग घेणाऱ्या बाजार ठेकेदारास मागील वर्षाच्या अंतिम बोलीच्या १/४ रक्कम किंवा रुपये ५०००/- या पैकी जे कमी असेल एवढी अमानत रक्कम लिलाव अधिकाऱ्या जवळ जमा करावी लागेल.

२. लिलावा नंतर अंतिम बोली ज्याची सर्वात जास्त राहील त्यांना अंतिम बोलीच्या रक्कमे पैकी अर्धी रक्कम त्याच दिवशी भरावी लागेल, हया मध्ये अनामत रक्क मेचा समावेश होईल. ) संबंधीत ठेकेदाराने लिलावाची अर्धी रक्कम भरल्यानंतर क्रमांक (२) च्या बोलीधारकाची रक्कम वगळता इतर सर्व ठेकेदारांस अनामत रक्कम त्याचदिवशी परत करण्यांत येईल. जर क्रमांक (१) च्या ठेकेदाराने (म्हणजे ज्यांची सर्वात जास्त बोली आहे असा ठेकेदार.) अर्धी रक्कम त्याच दिवशी भरण्यांस नकार दिल्यास अथवा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेपावेतो न भरल्यांस त्याची अनामत रकम जप्त होईल व क्रमांक (२) च्या ठेकेदारांस प्रथम ठेकेदाराच्या बोलीची अर्धी रक्कम तात्काळ दुस-या दिवशी भरावी लागेल, अन्यथा त्याची सुध्दा अनामत रक्कम जप्त होईल मात्र अट अशी की ही बोली जिल्हा परिषदेला परवडणारी असेल.

३. ज्या ठेकेदाराकडे आधीच्या लिलावाच्या रक्कमेतील बकाया रक्कम असेल त्यांना लिलावात भाग घेता येणार नाही व भाग घेतल्यास त्या ठेकेदाराकडुन मागील बाजार लिलाव थकबाकिची रक्कम वसुल करण्याची कार्यवाही करण्यात येईल या बाबत कोणतीही सबब एकल्या जाणार नाही.

४. बाजार लिलावाची जी रक्कम वसुल पात्र असेल ती भरण्यास सबंधित ठेकेदाराने कुचराई केल्यास जी रक्कम वसुल पात्र असेल ती जमिन महसुलाची थकबाकी म्हणुन वसुल केल्या जाईल.

५. बोलीची सुरुवात आधीच्या वर्षी बाजाराची जी बोली रक्कम निश्चित होती त्या बोलीच्या अर्ध्यापेक्षा जास्त असावी.

६. लिलावास सक्षम अधिका-याची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर लिलावाची बोलीची राहिलेली उर्वरीत संपुर्ण रक्कम या कार्यालयाचे पत्र प्राप्त झाल्या पासून आठ दिवसाच्या आत तात्काळ या कार्यालयाकडे जमा करावी लागेल. असे न केल्यास ठेकेदाराची पुर्वी भरलेली अर्धी रक्कम जप्त करण्यात येईल. तथा त्या बाजाराचा फेर लिलाव करण्यात येईल यावर संबधिताचा कोणताही उजर वा हक्क राहणार नाही.

७. लिलावाची उर्वरित संपुर्ण रक्कम ठेकेदाराने भरल्यावर रुपये १००/- किवा शासकिय नियमाप्रमाणे आवश्यक रक्कमेच्या स्टॅम्पपेपरवर करारनामा करणे बंधनकारक राहिल.

८. लिलावाची बोली सरासरी किंमतीत न आल्यांस फेरलिलाव करण्यांत येईल.

९. कर व फि च्या वसुलीकरीता जिल्हा परिषदेने दिलेल्या पावतीपुस्तकाचा उपयोग दुकानदारांकडुन घेतलेल्या रक्कमेच्या पावत्या संबंधितास द्याव्या लागेल.

१०. जिल्हा परिषदेने बाजाराच्या नियंत्रणाखाली केलेल्या नियमांचा ठेकेदारांकडुन भंग झाल्यास ठेकेदारांस प्रकरणाचे स्वरुप पाहुन एकदा वाजवी संधी देवुन लिलाव रदद किंवा फेरलिलाव करण्याचा अधिकार मा. अध्यक्ष / मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचा राहिल.

११. ग्रामपंचायतीचे उत्पन्न वाढिचे दृटिकोणातुन आठवडी बाजार लिलाव प्रक्रियेत, ग्रामपंचायतीस भाग घेता येईल व बोली बोलता येईल तसेच हर्रास घेता येईल.

१२. बाजार संपल्यानंतर त्या जागेची साफसफाई करण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदारांची राहिल व त्या बाबतचा कोणताही मोबदला ठेकेदारांस मागता येणार नाही.

१३. लिलाव मंजूरी प्राधिकारी- रु.५०००/- पर्यतच्या लिलावास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची, रु.५,००१ ते रु.५०,०००/- पर्यतच्या लिलावास स्थायी समिती सभा, तसेच ५०,००१/- चे वरील लिलावास सर्वसाधारण सभा, जिल्हा परिषद वर्धा यांचे मंजूरीचे अटीचे अधिन राहील.

१४. लिलावाचे वेळी तीन बोलीवर लिलावाची रक्कम स्विकारण्यात येईल मात्र अंतीम मंजूरी सक्षम अधिका-याकडून/ प्राधिकाराकडून प्राप्त झाल्याशिवाय लिलाव पक्का झाला असे समजण्यात येणार नाही.

१५. ठेकेदाराला किंवा बाजार अधिक्षकामार्फत ठेकेदाराने नियुक्त केलेल्या प्रतिनिधिला परिशिष्ट 'अ' मध्ये दिलेल्या दराने किंवा त्यात जिल्हा परिषदेने संशोधन केले असल्यास सुधारीत दरानेच बाजार पटटी वसूल करता येईल.

१७. लिला घेणा-या ठेकेदारांना आठवडी बाजार पोट ठेक्याने देता येणार नाही. तसे केल्यास आढळून आल्यास लिलावाची जमा केलेली रक्कम जप्त करुन लिलाव रद्द करण्यात येईल.

१८. लिलावधारकास बाजार चिठ्ठी वसूली पावती बुकाकरीता निश्चित केलेल्या दराप्रमाणे जिल्हा निधी फंडात पावती/ चालन द्वारे जमा केल्यावरच बाजार चिठ्ठी वसूली पावती बुक देण्यात येईल.

१९. दैवी,नैसर्गिक आपत्ती व इतर कोणत्याही कारणामुळे बाजार काही दिवस बंद राहिल्यास त्यांची नुकसान भरपाई

२०. लिलाव मंजूर/ नामंजूर करण्याचे अधिकार जिल्हा परिषदेकडे सुरक्षित राहतील.

२१. लिलावाबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा हे अपीलीय अधिकारी राहतील व त्यांचा निर्णय संबंधित लिलावधारकावर बंधनकारक व अंतीम असेल.

२२. सहरहु प्रकरणी न्यायालयीन बाब निर्माण झाल्यास वर्धा न्यायालयाचे क्षेत्रात प्रकरण दाखल करणे बंधनकारक राहील.

२३. वरील बाबतीत किंवा याशिवाय कोणताही फेरबदल करण्याचा अंतिम अधिकार मा.अध्यक्ष/मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, वर्धा यांचा राहिल.

(विपूल जाधव)
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)**
**जिल्हा परिषद,वर्धा,**

(स. भा. शेळके)
**मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी**
**जिल्हा परिषद,वर्धा,**

(नयना गुंडे)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद,वर्धा,**

# जिल्हा परिषद, वर्धा
## आठवडी बाजार ई - लिलाव सन २०१८-१९

जिल्हा परिषद, वर्धा अंतर्गत आठवडी बाजार ई लिलाव करीता खालील प्रमाणे बाजारांची ई निविदा प्रक्रीया मागविण्यात येत आहे. बाजारांचा तपशिल खालील प्रमाणे आहे. ई निविदेकरीता बयाना रक्कम रुपये १००००/- व निविदा संचाची किंमत रु. ५००/- आहे. तसेच करारनामा ३१ मार्च. २०१९ पर्यत राहील.

१. पं.स. वर्धा अंतर्गत **आंजी (मो.)** -लिलाव सरकारी किंमत रु.**२,२५,४७४**/- लिलाव दि. १४/०२/२०१८ वेळ स. **११** ते दु.**१** पर्यत
२. पं.स. वर्धा अंतर्गत मदनी - लिलाव सरकारी किंमत रु. **१,१७,८४०**/- लिलाव दि. १४/०२/२०१८ वेळ दु. **१** ते **३** पर्यत
३. पं.स. समुद्रपूर अंतर्गत मांडगांव - लिलाव सरकारी किंमत रु. **१,६५,९०२**/- लिलाव दि. १४/०२/२०१८ वेळ दु. **३** ते **५** पर्यत
४. पं. स. समुद्रपूर अंतर्गत कोरा - लिलाव सरकारी किंमत रु. **१,९६,९०९**/- लिलाव दि. १५/०२/२०१८ वेळ स. **११** ते **१** पर्यत
५. पं.स. हिंगणघाट अंतर्गत शिरसगांव -लिलाव सरकारी किंमत रु. **१,०९,५६०**/- लिलाव दि. १५/०२/२०१८ वेळ दु. **१** ते **३** पर्यत.
६. पं.स. हिंगणघाट अंतर्गत पोहना - लिलाव सरकारी किंमत रु. **१,०१,७६०**/- लिलाव दि. १५/०२/२०१८ वेळ दु. **३** ते **५** पर्यत.

| अ.क्र. | ई लिलावाचा तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रकाशित करण्याचा दिनांक | **०१/०२/२०१८** ला सकाळी **१०.००** वाजेपासून |
| २ | कागदपत्रे व पेमेंट प्रस्तुत करण्याचा सुरुवातीचा दिनांक | **०१/०२/२०१८** ला सकाळी **१०.००** वाजेपासून |
| ३ | कागदपत्रे व पेमेंट प्रस्तुत करण्याचा शेवटचा दिनांक | ०७/०२/२०१८ ला सायं. ५.०० वाजेपर्यत |
| ४ | कागदपत्रे व पेमेंट अनुमोदीत करण्याचा सुरुवातीचा दिनांक | ०७/०२/२०१८ ला सायं. ५.०० वाजेपर्यत |
| ५ | कागदपत्रे व पेमेंट अनुमोदीत करण्याचा शेवटचा दिनांक | ०९/०२/२०१८ ला सायं. ४.०० वाजेपर्यत |
| ६ | लिलावाचा दिनांक | **बाजार निहाय वरील प्रमाणे** |

निविदेतील अटी व शर्ती व निविदा सुचना http:www.eauction.gov.in या वेब साईट वर सविस्तर पाहावयास मिळेल.

## सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षाकरिता आठवडी बाजार ई लिलावाच्या अटी व शर्ती.

१. ई लिलावात भाग घेणाऱ्या इच्छुक कंत्राटदारांना को-या निविदा संचाची किंमत रु. ५००/- व निविदा बयाना रक्कम १००००/- मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचे नावे दोन वेगळया डिमांड ड्राप्ट (DD) मध्ये **दि. ०७/०२/२०१८ ला सायं. ५.००** वाजेपर्यत सादर करावी.
२. सर्व पात्र इच्छुक निविदा धारकांनी ई निविदा पत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रीयेत भाग घेण्यासाठी ई लिलाव प्रणालीच्या main portal **http:www.eauction.gov.in** याचा वापर करावा.
३. इच्छुक कंत्राटदारांनी को-या निविदा ई निविदा अंतर्गत ऑनलाईन विकत घ्यावयाच्या आहे. जे ठेकेदार प्रथमच ई निविदा प्रक्रियेत भाग घेत आहे. त्यांना वरील संकेतस्थळावर दिलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार प्रथम डिजिटल सिग्नेचर युजर आयडी व पासवर्ड विहित वेळेत प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.
४. निविदा धारकांनी निविदा संदर्भात मागणी केलेले दस्ताऐवज ऑनलाईन सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा ऑनलाईन निविदा स्विकारल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी. आधार कार्ड व पॅन कार्ड सादर करावे.
५. ई - निविदा प्रणाली अंतर्गत विहीत दिंनांका नंतर निविदा स्विकारल्या जाणार नाहीत व जे निविदाधारक लिलाव प्रक्रीयेमध्ये अपात्र ठरतील त्यांनी भरलेली अमानत रक्कम चा डिमांड ड्राप्ट परत करण्यात येईल.
६. सर्वाधिक बोली बोलणा-या निविदाधारकास लिलाव सफल झाल्याचे कळल्यापासून २ दिवसाचे आत त्याचे लिलावाचे रक्कमेच्या अर्धी रक्कम व उर्वरीत रक्कम लिलाव मंजुर झाल्यावर भरावी लागेल. अर्धी रक्कम दोन दिवसात भरण्यास नकार दिल्यास अथवा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेपावेतो न भरल्यास त्याची अनामत रक्कम जप्त होईल व लिलाव रद्द केल्या जाईल.
७. **लिलावास सक्षम अधिका-याची मंजुरी प्राप्त झाल्यानंतर लिलावाची बोलीची राहिलेली उर्वरीत संपुर्ण रक्कम या कार्यालयाचे पत्र प्राप्त झाल्यापासून आठ दिवसाच्या आत तात्काळ या कार्यालयाकडे जमा करावी लागेल. असे न केल्यास ठेकेदाराची पुर्वी भरलेली अर्धी रक्कम जप्त करण्यात येईल. तथा त्या बाजाराचा फेर लिलाव करण्यात येईल यावर संबधिताचा कोणताही उजर वा हक्क राहणार नाही.**
८. लिलावाची उर्वरित संपुर्ण रक्कम ठेकेदाराने भरल्यावर रुपये १००/- किंवा शासकिय नियमाप्रमाणे आवश्यक रक्कमेच्या स्टॅम्पपेपरवर करारनामा करणे बंधनकारक राहिल.
९. लिलावाची बोली सरासरी किंमतीत न आल्यांस फेरलिलाव करण्यात येईल.

१०. बाजार लिलावाची जी रक्कम वसुल पात्र असेल ती भरण्यास संबंधित ठेकेदाराने कुचराई केल्यास जी रक्कम वसुल पात्र असेल ती जमिन महसुलाची थकबाकी म्हणुन वसुल केल्या जाईल.

११. कर व फि च्या वसुलीकरीता जिल्हा परिषदेने दिलेल्या पावतीपुस्तकाचा उपयोग दुकानदारांकडुन घेतलेल्या रक्कमेच्या पावत्या संबंधितास द्याव्या लागेल.

१२. दैवी.नैसर्गिक आपत्ती व इतर कोणत्याही कारणांमुळे बाजार काही दिवस बंद राहिल्यास त्यांची नुकसान भरपाई ठेकेदारास मागता येणार नाही.

१३. जिल्हा परिषदेने बाजाराच्या नियंत्रणाखाली केलेल्या नियमांचा ठेकेदारांकडुन भंग झाल्यास ठेकेदारांस प्रकरणाचे स्वरुप पाहुन एकदा वाजवी संधी देवुन लिलांव रदद किंवा फेरलिलांव करण्याचा अधिकार मा. अध्यक्ष / मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचा राहील.

१४. ग्रापंचायतीचे उत्पन्न वाढिचे दृष्टिकोणातुन आठवडी बाजार ई- लिलाव प्रक्रियेत, ग्रामपंचायतीस भाग घेता येईल.

१५. बाजार संपल्यानंतर त्या जागेची साफसफाई करण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदारांची राहिल व त्या बाबतचा कोणताही मोबदला ठेकेदारांस मागता येणार नाही.

१६. वरील बाबतीत किंवा याशिवाय कोणताही फेरबदल करण्याचा अंतिम अधिकार मा.अध्यक्ष/मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, वर्धा यांचा राहिल.

१७. यशस्वी निविदाधारकास, नियम व अटी नुसार करार पूर्ण करु शकत नसल्याचे दिसून आल्यास त्याने भरलेली अमानत रक्कम जप्त करण्यात येईल व लिलाव रद्द करण्यात येईल.

१८. यशस्वी निविदाधारकाने ५० टक्के रक्कमेचा भरणा केल्यानंतर पूर्ण रक्कम भरेपर्यत लिलावात घेतलेला बाजार संबंधितास सुपूर्द केल्या जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| (विपूल जाधव) | (स.भा. शेळके) | (मयना गुंडे) |
| **उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)** | **मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी** | **मुख्य कार्यकारी अधिकारी,** |
| **जिल्हा परिषद,वर्धा,** | **जिल्हा परिषद,वर्धा,** | **जिल्हा परिषद,वर्धा,** |